प. ८२५

नाशिक महानगरपालिका, नाशिक
घनकचरा व्यवस्थापन विभाग
राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.

---

**लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक २२.११.२०२३**
**इतिवृत्त क्रमांक — ३४**

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक २२.११.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता अतिरिक्त आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त :- अध्यक्ष
२) उपआयुक्त ( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.



CamScanner

प.४२६

**संदर्भ :** (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - ०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३.

(२) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३२०४/२०२३ दिनांक २३ मार्च २०२३.

(३) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३९५०/२०२३ दिनांक १० एप्रिल २०२३.

(४) कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्रमांक:-सफाई २०२३/प्र.क्र.४७/सआक दिनांक ७ ऑगष्ट २०२३ रोजीचे पत्र.

(५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- बीसीसी - २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ -ब, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील दिनांक १२ डिसेंबर,२०११

आज दिनांक २२.११.२०२३ रोजीच्या बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थीत असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. उपस्थीत सदस्यांसमोर लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसाहक्काच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतुदीबाबत महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सफाई -२०१८/प्र.क्र.४६/सआक,मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजीचा निर्गमीत झालेल्या शासन निर्णयातील नमुद मुद्येनिहाय सर्व तरतुदींचे वाचन करणेत आले.

दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजी निर्गमीत झालेल्या शासन निर्णयांतील काही मुद्ये हे अस्पष्ट,संभ्रम अवस्था निर्माण होणारे किंवा निश्चित करणेस / अंमलबजावणी करणेस कठिण असल्याचे दि.२८.०२.२०२३ रोजीच्या बैठकीत निदर्शनास आल्याने याबावत निवड समितीने शिफारस केलेनुसार मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने मा. शासनाचे मार्गदर्शन घेणेकामी दि.२३.०६.२०२३ रोजी मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मुंबई यांना पत्र देण्यात आले. परंतु,याबावत नाशिक महानगरपालिकेस मा. शासनाकडील कोणतेही मार्गदर्शन अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाही.

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३२०४/२०२३, दिनांक २३ मार्च, २०२३ चे निर्णयानुसार लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सेवानिवृत्त सफाई कामगारांच्या रिक्त पदी वारसा हक्काने नेमणूक करणेस पुढील आदेश होईपावेतो स्थगिती दिलेली आहे. त्यास्तव, वारसा हक्क नियुक्ती प्रकरणे सद्यस्थितीत स्थगित ठेवणेत आलेली आहेत.

तथापि, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी न्यायालयीन रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ दिनांक १०.०४.२०२३ चे आदेशामध्ये "वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या पात्र वारसांना वारसाहक्काने नियुक्त देण्यापासुन सुट देण्यात आली असुन या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने नियुक्ती देण्यास स्थगिती दिलेली आहे. त्यानुसार, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करावी." असे नमुद आहे. तसेच, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत मा.कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ७ ऑगष्ट २०२३ चे पत्र प्राप्त झाले.

त्याअनुषंगाने दिनांक २८.०२.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार सादर करणेत आलेल्या एकुण २१ प्रलंबित प्रकरणांपैकी वाल्मिकी, मेहतर व भंगी प्रवर्गाचे प्रकरणांबाबत निर्णय घेणेकामी कर्मचारी निवड समितीसमोर सादर करणेस मा. आयुक्त महोदय यांनी आदेशीत केले प्रमाणे वाल्मिकी, मेहतर व भंगी (रुखी) प्रवर्गाचे प्रलंबीत व नव्याने प्राप्त झालेले एकुण २१ प्रकरणे व सफाई कर्मचारी विकास युनियन यांनी मेघवाळ समाज हा भंगी या जाती प्रवर्गाचाच भाग असल्याने मेघवाळ प्रवर्गातील वारसाहक्काची प्रकरणे निर्णयास्तव कर्मचारी निवड समितीसमोर सादर करावीत अशी मागणी केल्याने याबाबतच्या निर्णयास्तव तशी एकुण ०५ प्रकरणे आजच्या बैठकी समोर सादर करण्यात आले.

शासन निर्णयातील मुद्या क्रमांक ८.४ मध्ये सफाई कामगाराच्या वारसास नियुक्ती देण्यापुर्वी संबंधित वारसाचे जात वैधता पमाणपत्र संबंधित कार्यालयाने प्राप्त करुन घ्यावे. असे नमुद आहे. तथापि, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- बीसीसी - २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ -ब, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील दिनांक १२ डिसेंबर,२०११ रोजीचे शासन निर्णयातील निर्णय क्र.०२ व निर्णय क्रमांक ०३ मध्ये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत जात वैधता पमाणपत्र सादर करण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याने आदेश निर्गमीत करावेत.असे नमुद आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड) | (सुरेखा जाधव) | (प्रतिभा मोरे) | (प्रशांत पाटील) | (श्रीकांत पवार) | (प्रदिप चौधरी) |
| संचालक, (घ. व्य. वि.) | मुख्य वित्त व लेखाधिकारी | प्र. मुख्य लेखापरिक्षक | उपआयुक्त (समाजकल्याण ) | उपआयुक्त (प्रशासन /कर) | अतिरिक्त आयुक्त |

प.४२७

बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेनुसार उकत् नमुदप्रमाणे शासन निर्णयातील काही मुद्यांबाबत मा. शासनाचे मार्गदर्शन घेणेकामी दि.२३.०६.२०२३ रोजी सादर केलेल्या पत्राचे मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मुंबई यांना स्मरणपत्र देणे, मुद्या क्र. ०५ नुसार सफाई कामगाराचे नामनिर्देशन व वारसाच्या नियमक्तीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती ही पारदर्शक होणेकामी प्रथमत: लाड कमिटीची नोंदवही (Master Ragister) तयार करणे, सफाई कामगार सेवेत असतांनाच त्याच्याकडून विहीत नमुन्यात वारस म्हणुन कुटुंबातील सदस्यांचे नामनिर्देशन पत्र भरुन घेणेकरीता लाड कमिटीचा उल्लेख करुन विहीत नमुन्यात नातनिर्देशन पत्र तयार करावे व त्याची एक प्रत संबंधितास द्यावी.

सादर सुचीनुसार विषय क्रमांक ०१ मधील सारणीत नमुद असलेल्या वाल्मिकी, मेहतर व भंगी (रुखी) प्रवर्गातील वारसांची सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस कमिटीने केलेली आहे अशा खालील वारसांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिण्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ही अट नियुक्ती आदेशात प्रामुख्याने नमुद करावी. पात्र वारसास नियुक्ती आदेश देतेवेळीसच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेकामी लेखी कळविणे . तसेच, सहा महिने कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित वारसाची / कर्मचाऱ्याची नियुक्ती संपुष्टात आणण्याची कार्यवाही घनकचरा व्यवस्थापन विभागाने करावी.ईत्यादी निर्देश समितीने एकमताने दिले.

**विषय क्रमांक :- १) वाल्मिकी, मेहतर व भंगी (रुखी) प्रवर्गाचे प्रलंबीत व नव्याने प्राप्त झालेले प्रकरणे**

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| १. | **श्री. सुनिल सोहनलाल चटोले**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.अभिषेक सुनिल चटोले**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.अभिषेक सुनिल चटोले, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २. | **श्रीम.बाला रमेश बिगानिया**<br>सेवानिवृत्त सफाई कामगार | **श्रीम.ममता मुकेश बिगानिया**<br>सुन | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.३) या तरतुदीनुसार 'सुन' या नात्याने **श्रीम.ममता मुकेश बिगानिया, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.**<br>तथापि, सदर प्रकरणी वारसाचे प्रस्तावीत नाव आणि शाळा सोडल्याचा दाखला व जातीचा दाखला यातील नमुद नावात तफावत निदर्शनास येत आहे. याबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा नावाबाबत प्रतिज्ञापत्र सादर करणेस श्रीम.ममता बिगानिया यांना कळविणे. श्रीम.ममता बिगानिया यांनी अपेक्षीत दस्तांची पुर्तता केल्यानंतर सादर केलेले दस्त समाधानकारक असल्यास श्रीम.ममता मुकेश बिगानिया यांचे नियुक्ती आदेशाबाबत पुढील कार्यवाही घनकचरा व्यवस्थापन विभागाने करावी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड) | (सुरेखा जाधव) | (प्रतिभा मोरे) | (प्रशांत पाटील) | (श्रीकांत पवार) | (प्रदिप चौधरी) |
| संचालक, (घ. व्य. वि.) | मुख्य वित्त व लेखाधिकारी | प्र. मुख्य लेखापरिक्षक | उपआयुक्त (समाजकल्याण ) | उपआयुक्त (प्रशासन /कर) | अतिरिक्त आयुक्त |



CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| ३. | **श्रीम. सुशिला रामपाल चव्हाण**<br>सेवानिवृत्त सफाई कामगार | **श्री.सागर रामपाल चव्हाण**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.सागर रामपाल चव्हाण, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ४. | **श्री. दयानंद सनेरा पवार**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.कल्पेश दयानंद पवार**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.कल्पेश दयानंद पवार, हे सफाई कामगारपदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ५. | **कै.अशोक प्रितम लोट**<br>मयत सफाई कामगार | **श्री.राहुल अशोक लोट**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.राहुल अशोक लोट, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.**<br>तथापि, वारस नामनिर्देशनपत्र (Form 'E') व रेशनकार्डमध्ये श्री. रोहीत अशोक लोट यांचे मुलगा म्हणुन नाव नमुद आहे परंतु कै.अशोक प्रितम लोट यांचे रिक्तपदी श्री.राहुल अशोक लोट यांना नियुक्ती देणेकामी संमती दिली असल्याबाबतचे संमतीपत्र सादर केल्याचे निदर्शनास येत नाही. त्यास्तव श्री. रोहीत अशोक लोट यांचे संमतीपत्र प्राप्त करुन घ्यावे. श्री. राहुल लोट यांचा सद्यस्थितीतील चारीत्र पडताळणी अहवाल प्राप्त करुन घ्यावा.<br>तसेच, श्री. राहुल अशोक लोट यांचे चारीत्र पडताळणी अहवालात नमुदनुसार त्यांचेविरुध्द भद्रकाली पोलिस स्टेशन येथे दाखल असलेली केस नं.४२३-२०१९ भादंवि ३२५,३४ ई. मधुन तक्रारदाराच्या संमतीने मा. उच्च न्यायालयाने FIR रद्द करणेचा आदेश केला आहे. प्रकरण निकाली काढली असल्याचे नमुद आहे. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनमार्फत अथवा अन्य त्रयस्थ व्यक्तीने मा.उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल केले किंवा कसे ? याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा. **पोलीस स्टेशनकडील अहवाल व श्री. रोहीत अशोक लोट यांचे संमतीपत्र समाधानकारक असल्यास श्री.राहुल अशोक लोट यांचे नियुक्ती आदेशाबाबत पुढील कार्यवाही घनकचरा व्यवस्थापन विभागाने करावी.** |

(डॉ.आवेश पलोड)
संचालक, (घ. व्य. वि.)

(सुरेखा जाधव)
मुख्य वित्त व लेखाधिकारी

(प्रतिभा मोरे)
प्र. मुख्य लेखापरिक्षक

(प्रशांत पाटील)
उपआयुक्त (समाजकल्याण )

(श्रीकांत पवार)
उपआयुक्त (प्रशासन /कर)

(प्रदिप चौधरी)
अतिरिक्त आयुक्त



CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| ६. | **श्री.शाम प्रितम लोट**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. लोकेश शाम लोट**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. लोकेश शाम लोट, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.**<br>**तथापि**, श्री. लोकेश लोट यांचा सद्यस्थितीतील चारीत्र पडताळणी अहवाल प्राप्त करुन घ्यावा. तसेच,श्री. लोकेश शाम लोट यांचे चारीत्र पडताळणी अहवालात नमुदनुसार त्यांचेविरुध्द उपनगर पोलिस ठाणे येथे दाखल असलेली केस नं.७१/२०१८ भादवि कलम ३२४,३२३,५०४,५०६ सह ३४ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (६) मधुन निर्दोश मुक्तता करुनं सदरची केस निकाली काढणेत आली असल्याचे नमुद आहे. त्यास्तव तसेच, मा.न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, मोटारवाहन न्यायालय, नाशिकरोड यांचेकडील सदर केसच्या निकालाची छायांकीत प्रत सादर केलेली आहे. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनमार्फत अथवा अन्य त्रयस्थ व्यक्तीने मा.उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल केले किंवा कसे ? याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा. अहवाल समाधानकारक असल्यास श्री. लोकेश शाम लोट यांचे नियुक्ती आदेशाबाबत पुढील कार्यवाही घनकचरा व्यवस्थापन विभागाने करावी. |
| ७. | **कै.सरणपाल संतु चव्हाण**<br>मयत सफाई कामगार | **श्री.जसवंत सरणपाल चव्हाण**<br>मुलगा | श्री.जसवंत सरणपाल चव्हाण यांचे चारीत्र पडताळणी अहवालात नमुदनुसार त्यांचेविरुध्द भद्रकाली पोलिस स्टेशन येथे दाखल असलेली केस नं.८४९-२०१९ भादवि ३२४,३२३ ई.मुंबई पोलीस ॲक्ट १३५ मा.न्यायालयाकडे प्रलंबीत असल्याचे नमुद आहे. सदर **केसबाबत सद्यस्थीती ची माहिती तथा खुलासा संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घ्यावा. माहिती प्राप्त झालेनंतर सदरचे प्रकरण पुढील कर्मचारी निवड समितीसमोर सादर करावे. तद्नंतर निर्णय घेणे योग्य होईल. असे समितीचे मत आहे.** |
| ८. | **कै.चुन्नु चंदर चंडालिया**<br>दिवंगत सफाई कामगार | **श्री.हरिष चुन्नु चंडालिया**<br>मुलगा | कै.चुन्नु चंदर चंडालिया, मयत सफाई कामगार, यांचे दि.२०.०३.२०१७ रोजी निधन झाल्याने त्यांचे रिक्तपदी त्यांचा मुलगा श्री.हरिष चुन्नु चंडालिया याचे वय १८ पुर्ण झाल्याने त्यास नोकरी देणेबाबत त्यांची पत्नी श्रीम.सुषमा चुन्नु चंडालिया यांनी दि.१५.०५.२०२० व श्री.हरिष चुन्नु चंडालिया यांनी नोकरी मिळणेबाबत दि. ०४.१०.२०१९ रोजी सादर केलेले अर्ज हे विहीत मुदतीपेक्षा दोन वर्ष विलंबाने सादर केले आहे.<br>**श्री.हरिष चुन्नु चंडालिया यांचा नोकरी मिळणेबाबतचा अर्ज विहीत मुदतीत नसल्याने लाड कमिटी शिफारशींच्या नियमानुसार ते वारसाहक्काने नियुक्ती अपात्र होत असल्याने त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करता येत नाही.** |

(डॉ.आवेश पलोड)
संचालक, (घ. व्य. वि.)

(सुरेखा जाधव)
मुख्य वित्त व लेखाधिकारी

(प्रतिभा मोरे)
प्र. मुख्य लेखापरिक्षक

(प्रशांत पाटील)
उपआयुक्त (समाजकल्याण )

(श्रीकांत पवार)
उपआयुक्त (प्रशासन /कर)

(प्रदिप चौधरी)
अतिरिक्त आयुक्त

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| ९. | **कै. सलमा सत्तार कुरेशी**<br>दिवंगत सफाई कामगार | **श्री.आलम सत्तार कुरेशी**<br>मुलगा | कै.सलमा सत्तार कुरेशी, दिवंगत सफाई कामगार यांचे प्रथम नाव सिमला रतिया चव्हाण असे होते. प्रथम लग्नानंतर श्री.आझाद बिडलान यांचेपासुन १.सोनु आझाद बिडलान २. रोहित आझाद बिडलान असे दोन मुले झाले. आझाद बिडलान यांचे मृत्युनंतर श्री.अब्दुल सत्तार गफूर कुरेशी यांचेसोबत लग्न केले. त्यामुळे सिमला रतिया चव्हाण यांनी दोन्ही मुलांसह मुस्लीम धर्मात धर्मांतर केले. त्यामधे (१) सिमला रतिया चव्हाण ऐवजी सलमा सत्तार कुरेशी (२) सोनु आझाद बिडलान ऐवजी शोयब सत्तार कुरेशी (३) रोहित आझाद बिडलान ऐवजी शोयब सत्तार कुरेशी असे नावे घोषित केले आहे. व महाराष्ट्र शासन राजपत्रातदेखील नाव बदल केला आहे.<br>श्री.रोहित आझाद बिडलान ऊर्फ आलम सत्तार कुरेशी यांनी सादर केलेला शाळा सोडल्याचा दाखला व जातीचा दाखला यामधे त्यांचे नाव रोहित आझाद बिडलान व त्यांची जात वाल्मीकी नमुद आहे. परंतु वारस नामनिर्देशीत पत्र (Form E),आधारकार्ड, पॅनकार्ड आदी सर्व दस्तांवर आलम सत्तार कुरेशी असे नाव नमुद आहे.<br>अर्जदाराचे दोन नावे,सादर केलेला जातीचा दाखला, धर्म बदल केलेबाबतचे दस्त व मयत कर्मचारी यांनी हयातीत सादर केलेल्या नामनिर्देशन पत्रावर नमुद वारसदारांची नावे यामधे पुर्णत: विसंगती असल्याचे निदर्शनास येत असुन **सदर प्रकरणी मनपा विधीज्ञ यांचा विधी विभागाचा अभिप्राय घेणेत यावा. अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर निवड समितीवर निर्णय घेता येईल असे निवड समितीचे मत आहे.** |
| १० | **श्रीम.गंगाबाई प्रकाश सौदे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.दिपक प्रकाश सौदे**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्रं.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.दिपक प्रकाश सौदे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ११ | **श्री.सुनिल रामचंद्र गोगलिया**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. रोहित सुनिल गोगलिया**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. रोहित सुनिल गोगलिया, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १२ | **सौ.ज्योती अशोक तसांबड**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. सुमित अशोक तसांबड**<br>मुलगा | श्री.सुमित अशोक तसांबड यांनी दि.१२.०४.२०२३ रोजी अर्ज सादर करुन लाड पागे कमिटीच्या शिफारशीनुसार शैक्षणिक अर्हतेनुसार स्वच्छता निरिक्षक हया पदावर नियुक्ती मिळणेस नमुद केलेले आहे.<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ७ मधील तरतुदीनुसार **श्री.सुमित अशोक तसांबड यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेता वर्ग -३ च्या पदाकरीता पुढील कार्यवाहीस्तव सदरचे प्रकरण नियमोचित निर्णयास्तव सामान्य प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात यावे. असे निवड समितीचे मत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक, (घ. व्य. वि.) | (सुरेखा जाधव)<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (प्रतिभा मोरे)<br>प्र. मुख्य लेखापरिक्षक | (प्रशांत पाटील)<br>उपआयुक्त (समाजकल्याण ) | (श्रीकांत पवार)<br>उपआयुक्त (प्रशासन /कर) | (प्रदिप चौधरी)<br>अतिरिक्त आयुक्त |

पं ८३७

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| १३ | **श्रीम.शकुंतला करणसिंग कल्याणी**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.हितेश करणसिंग कल्याणी**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.हितेश करणसिंग कल्याणी, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १४ | **श्री. रमेश सुरजसिंग लोट**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.तिलक रमेश लोट**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.तिलक रमेश लोट, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १५ | **श्री.रणजित विष्णू कल्याणी**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. शुभम रणजित कल्याणी**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. शुभम रणजित कल्याणी, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १६ | **श्री. सचिन शिवराम परमार**<br>स्वेच्छानिवृत्त स्वच्छता मुकादम | **सौ.स्मिता सचिन परमार**<br>पत्नी | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.३) या तरतुदीनुसार 'पत्नी' या नात्याने **सौ.स्मिता सचिन परमार, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १७ | **श्री.शाम किशोर पवार**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. साहिल शाम पवार**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. साहिल शाम पवार, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक, (घ. व्य. वि.) | (सुरेखा जाधव)<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (प्रतिभा मोरे)<br>प्र. मुख्य लेखापरिक्षक | (प्रशांत पाटील)<br>उपआयुक्त (समाजकल्याण ) | (श्री[illegible] पवार)<br>उपआयुक्त (प्रशासन /कर) | (प्रदिप चौधरी)<br>अतिरिक्त आयुक्त |

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| १८ | **श्रीम.लक्ष्मी दिपक गिरजे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.सुरज दिपक गिरजे**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.सुरज दिपक गिरजे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १९ | **श्री.इंदल चुनिलाल बहोत**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.विवेक इंदल बहोत**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.विवेक इंदल बहोत, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २० | **कै.सुनिल लिलाराम गिरजे**<br>दिवंगत सफाई कामगार | **श्री.रोहित सुनिल गिरजे**<br>मुलगा | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्रीं.रोहित सुनिल गिरजे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २१ | **कै.गिता राजेश चंडालिया**<br>दिवंगत सफाई कामगार | **श्रीम.अन्नु राजेंद्र चव्हाण**<br>नामनिर्देशीत व्यक्ती - पुतणी | कै.गिता राजेश चंडालिया, यांचे रिक्तपदी नोकरी मिळणेकामी श्रीम. कोमल राजेश चंडालिया व श्रीम. अन्नु राजेश चव्हाण यांनी अर्ज सादर केल्याने सदर वादग्रस्त प्रकरणी यापुर्वी मा. अति. आयुक्त सो. (सेवा) यांनी वारसांची प्रत्यक्ष सुनावणी घेऊन वारसांनी मा. न्यायालयाकडील वारस प्रमाणपत्र सादर करावे याबाबत आदेशीत केलेले आहे.त्याबाबत संबंधितांना लेखी कळविणेत आलेले आहे. वारसांनी मा. न्यायालयाकडील वारस प्रमाणपत्र सादर न करता श्रीम. अन्नु राजेश चव्हाण यांना नोकरी मिळणेकामी संमतीपत्र सादर केल्याचे निदर्शनास येत आहे.<br>तथापि,मा. अति. आयुक्त सो. (सेवा) यांनी दिलेले निर्देश तथा आदेश कायम आहेत. त्यास्तव **कै.गिता राजेश चंडालिया यांचे वारसांनी मा. न्यायालयाकडील वारस प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सदर प्रकरणी निर्णय घेता येईल.असे समितीचे मत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड) | (सुरेखा जाधव) | (प्रतिभा मोरे) | (प्रशांत पाटील) | (श्रीकांत पवार) | (प्रदिप चौधरी) |
| संचालक, (घ. व्य. वि.) | मुख्य वित्त व लेखाधिकारी | प्र. मुख्य लेखापरिक्षक | उपआयुक्त (समाजकल्याण ) | उपआयुक्त (प्रशासन /कर) | अतिरिक्त आयुक्त |

**विषय क्रमांक :- २) सफाई कर्मचारी विकास युनियन यांनी मेघवाळ समाज हा भंगी या जाती प्रवर्गाचाच भाग असल्याने मेघवाळ प्रवर्गातील वारसाहक्काची प्रकरणे निर्णयास्तव कर्मचारी निवड समितीसमोर सादर करावीत अशी मागणी केल्याने याबाबतच्या निर्णयास्तव खालील प्रकरणे**

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| १ | **कै.प्रशांत वसंत चव्हाण**<br>दिवंगत सफाई कामगार | **श्री. दिनेश वसंत चव्हाण**<br>भाऊ | महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३२०४/२०२३, दिनांक २३ मार्च, २०२३ चे निर्णयानुसार लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सेवानिवृत्त सफाई कामगारांच्या रिक्तपदी वारसा हक्काने नेमणूक करणेस पुढील आदेश होईपावेतो स्थगिती दिलेली आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी न्यायालयीन रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ दिनांक १०.०४.२०२३ चे आदेशामध्ये "वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या पात्र वारसांना वारसाहक्काने नियुक्ती देण्यापासुन सुट देण्यात आली असुन या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने नियुक्ती देण्यास स्थगिती दिलेली आहे.<br>मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी न्यायालयीन रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ दिनांक १०.०४.२०२३ चे आदेशामध्ये "**वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती व्यतिरीक्त "मेघवाळ" हया जातीचा उल्लेख नमुद नसल्याने** डावीकडील नमुद अनुक्रमांक १ ते ५ मधील नियुक्ती देणेकामी प्रस्तावात नमुद केलेले वारस हे मेघवाळ जातीचे असल्याचे निदर्शनास येत असल्याने **त्यांची नियुक्तीकरीता शिफारस करता येत नाही.**<br>तथापि, सफाई कर्मचारी विकास युनियन यांनी सादर केलेल्या मेघवाळ समाजातील व्यक्ती व पुर्वीच्या कर्मचाऱ्यांच्या शाळा सोडल्याचा दाखला,सेवापुस्तकातील नोंदी इत्यादी दस्तांमधील जातीची नोंद ही भंगी-अनुसुचित जाती नमुद असल्याचे निदर्शनास येत असल्याने झालेल्या चर्चेनुसार मेघवाळ ही जात वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गाचाच भाग आहे किंवा कसे ? असल्यास **मेघवाळ प्रवर्गाच्या वारसांना नियुक्ती देणे याबाबत मा.शासनाचे मार्गदर्शन घ्यावे.**<br>तसेच, लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने वारसाहक्काने नेमणूक करणेबाबत **मा.न्यायालयाकडील पुढील आदेश / मा.शासनाकडील मार्गदर्शन प्राप्त होत नाही तोपावेतो वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती व्यतिरीक्त इतर जातींच्या वारसांची प्रकरणे कर्मचारी निवड समितीसमोर सादर करण्यात येवू नये. असे समितीचे मत आहे.** |
| २ | **कै.अरुण अशोक बर्वे**<br>दिवंगत सफाई कामगार | **श्री. अश्विन अशोक बर्वे**<br>भाऊ | |
| ३ | **श्री.सुनिल देवजी चव्हाण**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामागर | **श्री. शेखर सुनिल चव्हाण**<br>मुलगा | |
| ४ | **श्री. यशवंत गलजी बोरीचा**<br>सेवानिवृत्त स्वच्छता मुकादम | **श्री. राहुल यशवंत बोरीचा**<br>मुलगा | |
| ५ | **श्रीम.नंदा त्रिकम सोलंकी**<br>सेवानिवृत्त स्वच्छता मुकादम | **श्री. कपिल जयसिंग राठोड**<br>मुलगा | |

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन, दिलेले निर्देशानुसार कार्यपुर्ती करणेत यावी असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

**(डॉ.आवेश पलोड )**
**संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(सुरेखा जाधव)**
**मुख्य वित्त व लेखाधिकारी**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(प्रतिभा मोरे)**
**प्र. मुख्य लेखापरिक्षक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(प्रशांत पाटील)**
**उपआयुक्त (समाजकल्याण )**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(श्रीकांत पवार)**
**उपआयुक्त (प्र.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(प्रदिप चौधरी)**
**अतिरिक्त आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक